# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता - २०२३ च्या कलम १७३ अंतर्गत (Under Section 173 B.N.S.S.-2023)

1. राज्य State: महाराष्ट्र   जिल्हा District: मुंबई   पोलीस ठाणे Police Station: ला.प्र.वि   पहिली खबर क्र. FIR No.: 31   वर्ष Year: 2025   दिनांक Date: 27/09/25

2. (i) अधिनियम Act: प्र. प्र. अधिनियम 1988   कलमे Sections: 7
   (ii) अधिनियम Act: ........   कलमे Sections: ........
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections: ........

3. (a) अपराधाची घटना : Occurrence of offence : वार Day: बुधवार   तारीख पासून Date from: 17/9/25   वेळ Time: 15:30   तारीख पर्यंत Date to: 26/9/25   वेळ Time: 17:40

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा (Tick applicable portion).

(1) ००.०० ते ०३.००   (2) ०३.०० ते ०६.००   (3) ०६.०० ते ०९.००   (4) ०९.०० ते १२.००   (5) १२.०० ते १५.००
(6) १५.०० ते १८.००   (7) १८.०० ते २१.००   (8) २१.०० ते २४.००

(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S.   तारीख Date: 17/9/2025   वेळ Time: 15:30

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No.: 2/25   तारीख Date: 27/09/2025   वेळ Time: 07:30

4. माहितीचा प्रकार Type of Information: लेखी   लेखी / तोंडी Written / Oral

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. ........   चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O. P. Name and No.: 95101 टी ए पो. स्टे.

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name: 95101 टी.टि. पो. स्टे.   ठिकाणाचे नंबर No. if any: ........   गल्ली Ward: ........   रस्त्याचे नाव Name of road: एम. एम आर डी ए कार्यालय रोड

जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place: 95101 आर टि ओ परिसर   गाव Village: ........   पोस्ट Post: ........   तालुका Taluka: 95101   जिल्हा Dist.: मुंबई   राज्य State: महाराष्ट्र

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station: —   तालुका Taluka: —   जिल्हा Dist.: —   राज्य State: —

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

(a) नाव Name: श्री व्यंकटेश मुन्नास्वामी मानव   (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name: मुन्नास्वामी मानव

(c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age: 01/01/1962   (d) राष्ट्रीयत्व Nationality: भारतीय   फोन नं. Phone No.: 9820056260

(e) पारपत्र क्रमांक Passport No.: —   दिल्याचा दिनांक Date of issue: —   दिल्याचे ठिकाण Place of Issue: —   (f) व्यवसाय Occupation: —

(g) धर्म Religion: हिंदू   जात Caste: OBC   जनजात Sub-Caste: OBC

(h) पत्ता Address: ई-5101 बिल्डींग पहिला माळा,   गल्ली/सर्व्हे नं. Ward: ........   घर/नाव नं. House Name No.: 06   फोन/मो. नं. Phone No.: 9820056260   पॅन नं. Pan No.: ........   वोटर्स नं. Card No.: ........

रस्त्याचे नाव Road: अमर महल,   जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place: छेडा नगर मॉडर्न शाळे जवळ, चेंबूर मुंबई   गाव Village: ........   पोस्ट Post: ........   पो. स्टे. P. Stn.: 95101 टी ए पो. स्टे.

तालुका Taluka: चेंबूर   जिल्हा Dist.: मुंबई   राज्य State: महाराष्ट्र   सध्याचा पत्ता Present Address: वरील प्रमाणे

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा. ) ( संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे. )

Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

① श्री चंद्रकांत सुधाकर सरोदे वय 52 वर्षे पद :- वरिष्ठ पो.नि. निशिगंधा-304, सुप्रिया सो. प्लॉट क्र. 11, मोहिंदवाडी कल्याण (प) जि. ठाणे 422301
② श्री राहुल रमेश वाघमोडे, वय 37 वर्षे पद :- पोउ.नि. रूम नं. 07, ई-124 पंचशिल सो. नेहरू नगर, (मुंबई. मो.नं. 7058475256



Scanned with OKEN Scanner

-श्री व्यंकटेश मुत्तास्वामी यांचे वय 58 वर्षे रा. हि इंद्राणी बिल्डींग. पहिला मजला रूम नं. 06 अमर महल हेमु नगर चेंबूर मुंबई यांचा आज दि 27/09/25 रोजी स्वतंत्र पानावर टंकलिखीत केलेला जबाब हीच गुन्ह्याची प्रथम खबर संबोधण्यात येत आहे

समक्ष

निलेश थोरात
पोलिस निरीक्षक
ला.प्र.वि मुंबई

सही.

जबाब दिनांक २७/०९/२०२५

मी, व्यंकटेश मुन्नास्वामी मानव, हि./वय ५९ वर्षे, धंदा – टुरिस्ट व्यवसाय/समाजसेवा, रा.ठि. इंद्राणी बिल्डींग, १ ला माळा, रूम नं ०६, छेडानगर, मॉडर्न शाळेजवळ, अमरमहल, चेंबुर, मुंबई ८६. मो.न. ९८२००५६२६०, आधार कार्ड क्र. ७६१९९८२७०७०४.

मी वरीलप्रमाणे असुन नमुद पत्यावर अंदाजे २५ वर्षापासुन माझे कुटुंबासह राहत आहे. मी 'मुंबई तेलगु सेवा संघ', प्रतिक्षानगर, मुंबई या संस्थेचा चेअरमन असुन, सदर संस्थेवर अनधिकृत ताबा मिळविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करत असलेल्या 'बाबु सुलम' नावाच्या व्यक्तीबरोबर माझे वादविवाद चालु आहेत. दिनांक ०७/०९/२०२५ रोजी 'मुंबई तेलगु सेवा संघ' या संस्थेच्या प्रतिक्षानगर, मुंबई येथील कार्यालयात सकाळी ११:०० वा. चे सुमारास माझे विरोधक बाबु सुलम व त्यांचे सहकारी आमचे सोबत वाद घालु लागले. त्यामुळे मी पोलीस कंट्रोल रूमला कॉल करून पोलीस मदत मागविली, तेव्हा तेथे आलेल्या पोलीसांनी आम्हा सर्वांना पोलीस ठाणेस येण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी, माझे सहकारी तसेच बाबु सुलम व त्याचे सहकारी असे सर्व वडाळा टी.टी. पोलीस ठाणे, मुंबई येथे पोहोचलो. तेथे बाबु सुलम याने माझे चारचाकी वाहन टोयाटो कंपनीचे इनोव्हा क्रीस्टा ज्याचा वाहन क्रमांक एमएच–०३–डीयु–६११८ यावर "महाराष्ट्र शासन" असा फलक व "आमदार" असा स्टीकर लावलेला असल्याबाबत खोटी तक्रार पोलीसांकडे केली. त्यावरून पोलीसांनी माझेविरूध्द दिनांक ०७/०९/२०२५ रोजी गु.र.क्र.५८९/२५ कलम २०५ बी.एन.एस सह ३,७ भारताचे राज्य चिन्ह (अयोग्य उपयोग प्रतिबंध) अन्वये गुन्हा नोंदविला. त्यासंबंधाने दिनांक ०८/०९/२०२५ रोजी मला वडाळा टी.टी. पोलीस ठाणेतील नमुद गुन्हयाचे तपासी अधिकारी पीएसआय श्री. राहुल वाघमोडे यांनी नोटीस देउन संबधीत वाहनाचे कागदपत्रांसह जबाब नोंदविणेकामी दिनांक १०/०९/२०२५ रोजी हजर राहण्यास कळविले. त्याप्रमाणे मी दि. १०/०९/२०२५ रोजी वडाळा टी.टी.पोलीस ठाणे येथे पीएसआय श्री वाघमोडे यांना भेटलो असता, त्यांनी माझा जबाब नोंद करून गुन्हयाचे प्रकरण मिटविण्यासाठी व सदरची गाडी माझी मुलगी लिला हिच्या नावावर असल्याने तिच्याविरूध्द कारवाई न करण्यासाठी सुरूवातीस ५०,०००/–रूपयांची लाच मागणी करून त्याचवेळी २०,०००/– रूपये माझेकडुन स्विकारले व उर्वरीत ३०,०००/– रूपये २–३ दिवसांनी घेवुन येण्यास सांगीतले.

त्यावेळी मी पीएसआय श्री वाघमोडे यांना व्यक्ती नामे बाबु सुलम व त्याच्या सहकाऱ्यांविरोधात कारवाई करण्याची विनंती केली असता, पीएसआय श्री वाघमोडे यांनी त्यासाठी सिनीअर पीआय साहेबांना ५ लाख रूपये दयावे लागतील असे सांगीतले. मी त्यांना त्याकरीता नकार दिला. त्यांनी मला सिनीअर पीआय यांना भेटण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी त्याचवेळी वडाळा टी.टी. पोलीस ठाणेतील श्री. चंद्रकांत सरोदे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक असे नावाचा बोर्ड असलेल्या केबीनचे आत जावुन सिनीअर पीआय श्री. सरोदे यांना भेटलो. मी त्यावेळी श्री सरोदे यांचेशी बाबु सुलम व त्याचे सहकारी यांचेवर कारवाई करण्याबाबत चर्चा केली असता, श्री सरोदे यांनी मला परत पीएसआय श्री.वाघमोडे यांना भेटुन, वाघमोडे साहेब जसे सांगतील तसे करण्यास सांगीतले. त्यावेळी श्री वाघमोडे यांनी सांगितल्याप्रमाणे पाच लाख रूपये एवढी रक्कम माझेकडे नसल्याने मी श्री वाघमोडे यांना परत न भेटताच तेथुन निघुन आलो.

त्यानंतर दिनांक १५/०९/२०२५ रोजी मला पीएसआय श्री वाघमोडे साहेबांना भेटण्यास जाणे शक्य नसल्याने मी त्यांना फोन करून पोलीस ठाणेस येणे शक्य नसल्याचे सांगितले असता त्यांनी मला दि. १७/०९/२०२५ रोजी पोलीस ठाणेस येण्यास सांगितले.

मला वडाळा टी.टी. पोलीस ठाणे, मुंबई येथील कार्यरत असलेले पीएसआय श्री. राहुल वाघमोडे यांना उर्वरीत रु.३०,०००/– व सिनीयर पी.आय. श्री चंद्रकांत सरोदे यांना रु. ५,००,०००/– रक्कम देण्याची इच्छा नसल्याने, मी दिनांक १७/०९/२०२५ वार बुधवार रोजी सकाळी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे समक्ष हजर राहुन अपर पोलीस आयुक्त, श्री. संदीप दिवाण यांना भेटुन तक्रारीबाबत तोंडी माहिती दिली. त्यानंतर त्यांनी मला अपर पोलीस उप आयुक्त श्री घेरडीकर यांचेकडे पाठविले. श्री घेरडीकर यांनी माझे तक्रारअर्जावर पुढील कारवाई करण्याकरीता पोलीस निरीक्षक नितीन थोरात व पो.नि. कृष्णा मेखले लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई यांची नेमणुक करून त्यांचेशी माझी भेट घालुन दिली. त्याप्रमाणे मी त्यांना माझा टंकलिखित केलेला तक्रारअर्ज दिला. त्यावेळी पो नि श्री थोरात यांनी मला सदरचा तक्रार अर्ज स्वहस्ताक्षरात

Scanned with OKEN Scanner

लिहुन देण्याची विनंती केली. परंतु, त्यावेळी मी त्यांना मला मराठी भाषा समजते, बोलता येते व वाचता येते परंतु लिहिता येत नाही असे सांगीतले.

त्याच दिवशी दि.१७/०९/२०२५ रोजी मी दिलेल्या तक्रारीवर पंचासमक्ष पडताळणी करण्यात येणार असल्याचे मला पो.नि. थोरात यांनी सांगितले. त्याकामी पो.नि. नितिन थोरात यांनी दोन शासकीय पंचांना बोलावुन त्यांचेशी माझी ओळख करून दिली. त्यानंतर पो.नि. थोरात यांनी दोन पंचासमक्ष मी माझे मोबाईल क्र. ९८२००५६२६० वरुन वडाळा टी.टी. पोलीस ठाणेतील लोकसेवक पीएसआय श्री राहुल वाघमोडे यांचा मो.न. ७०५८४७५२५६ वर स्पिकर ऑन करुन कॉल केला. परंतु त्यांनी कॉल उचलला नाही. त्यानंतर मला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावुन माझे सोबत पंच श्री सानप यांना पाठवुन पीएसआय श्री. वाघमोडे यांना भेटण्यासाठी वडाळा टि.टी. पोलीस ठाणे, मुंबई येथे पाठवले असता, सदर ठिकाणी श्री वाघमोडे यांची समक्ष भेट झाली. त्यावेळी त्यांनी माझे सोबत असलेले पंच श्री सानप यांचेबाबत विचारपुस केली तेव्हा मी त्यांना ते आर.टी.ओ. एजंट असल्याची ओळख करुन दिली. त्यांनतर श्री.वाघमोडे मला म्हणाले की तुम्ही मला तो 'महाराष्ट्र शासन' लिहिलेली पाटी आणि आमदारचा लोगो असलेला स्टिकर आणुन दया, त्यावर मी त्यांना ते माझेकडे नाही असे सांगीतले असता ते मला म्हणाले ते तुम्ही घेवुन या संध्याकाळी काहितरी करून आपण हे संपवुन टाकु काहीतरी करून. त्यानंतर मी पंच श्री सानप यांचे सोबत परत पोलीस वाहनाजवळ आलो.

थोडयावेळानंतर मी व पंच श्री सानप असे पुन्हा श्री वाघमोडे यांची पोलीस ठाण्यास जावुन भेट घेतली. त्यावेळी आमचेमध्ये चर्चा चालु असतेवेळी पीएसआय वाघमोडे यांनी पंचांना बाहेर जाण्यास सांगुन मला बाबु सुलम व त्याचे सहकारी यांचेवर कारवाई करण्याकरीता **उजव्या हाताची पाच बोटे दाखवुन पैशांबाबत इशारा** केला. त्यावर मी त्यांना **"हू ....पाच पाच लाख! काय..काय हे ...पाच लाख हं"** असे म्हणालो असता ते मला म्हणाले **"किती करणार तुम्ही सांगा ?"** असे म्हणाले. त्यावर मी त्यांना **"दीड पर्यंत एक ...आपलं रिलेशन"** असे म्हणालो. त्यावर श्री वाघमोडे यांनी मला ते याबाबत श्री सरोदे यांचेसोबत बोलुन सांगतो असे सांगीतले. पुढे श्री वाघमोडे यांनी मला माझेविरूध्द दाखल गुन्हयाच काय करायचं असे त्यांच्याकडे तपासाकरीता असलेल्या गुन्हयात माझे मुलीस आरोपी न करता गुन्हयात मदत करण्याकरीता बोलणी झालेल्या ५०,०००/— पैकी उर्वरीत ३०,०००/— रू. साठी उजव्या हाताचे ०३ बोट दाखवुन इशारा केला. त्यावर मी त्यांना " ठीकेयं ना मी करून टाकतो ना" असे बोलुन **"तीस हजार?"** असे विचारले असता त्यांनी मला " **कधी... हं**" असे विचारले. त्यावर मी त्यांना "आता आणलं नाय मी.... आपण बोलू... त्याचं आणून दाखवू... संपवून टाकू साहेब" असे बोललो. तेव्हा ते मला म्हणाले " **ते संपवू त्याचं... मी बोलतो सरांना... बोलतो आणि तुम्हाला**" त्यावर मी त्यांना बोललो " फोन करा उदयाच ठेवू नका पण" त्यावर ते मला म्हणाले **"तेवढं जमा केलं असतं म्हणजे बरं झालं असत" " कोणाला तरी पाठवायचं होतं आता" " आता पाठवा कोणाला तरी"** त्यावर मी त्यांना म्हणालो **" तीस हजार पाठवू?"** त्यावर ते मला **"हु ....आता आपला.. आपला कोणतरी पाठवून दया माणूस"** असे बोलुन पीएसआय वाघमोडे यांनी करुन माझेकडे उर्वरित रु.३०,०००/— हे पाठवुन देण्यास सांगितले. त्यानंतर मी व पंच श्री सानप परत पोलीस वाहनाजवळ आलो व पोलीसांसोबत कार्यालयात परत आलो. त्यावेळी पो.नि. थोरात यांनी माझी व पीएसआय श्री. वाघमोडे यांचे संभाषणाची ट्रान्सस्क्रीप्ट बनवुन सदर पडताळणीवेळी लोकसेवक पीएसआय श्री. वाघमोडे यांनी माझ्याकडे उर्वरित रू. ३०,०००/— व मला बाबु सुलम व त्याचे सहकारी यांचेवर कारवाई करण्याकरीता वपोनि यांचे वतीने रू. ५,००,०००/— लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाल्याचे सांगुन सविस्तर पडताळणी पंचनामा केला. त्यानुसार सापळापुर्व व सापळा कारवाई करण्यात येणार असल्याचे मला पो.नि. थोरात साहेबांनी सांगितले.

मला दि.१९/०९/२०२५ रोजी माझे नागपुर येथे वैयक्तिक काम असल्याने मी ला.प्र.वि. वरळी मुंबई कार्यालयात हजर राहु शकलो नाही. त्यादरम्यान वडाळा टी.टी. पोलीस ठाणेतील पीएसआय वाघमोडे यांनी माझे मोबाईल वर कॉल करुन भेटी बाबत विचारणा केली, तेव्हा मी त्यांना नागपुर येथे असल्याचे सागुन सोमवार दि. २२/०९/२०२५ रोजी भेटतो असे सांगितले.

Scanned with OKEN Scanner

त्यानंतर मी दि.२२/०९/२०२५ रोजी ला.प्र.वि. वरळी मुंबई येथे समक्ष हजर राहुन पो.नि. श्री नितीन थोरात याना कार्यालयात भेटलो असता, त्यांचेकडे वडाळा टी.टी. सिनीयर पी.आय. चंद्रकांत सरोदे यांचेकडे जावुन पडताळणी करण्याबाबत विनंती केली. त्यानंतर पो.नि. थोरात यांनी मला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावुन पंच श्री सानप यांचेसह सिनीयर पी.आय.सरोदे यांना भेटण्यासाठी वडाळा टि.टी. पोलीस ठाणे येथे पाठविले. श्री सरोदे यांनी समक्ष भेटीवेळी माझे सोबत असलेले पंच यांचेबाबत विचारणा केली व त्यांना कॅबिनच्या बाहेर थांबण्यास सांगितले. त्यानंतर श्री सरोदे यांनी माझे विरोधक बाबु सुलम व त्याचे सहकारी यांचेवर कारवाई करण्याबाबत चर्चा केली. त्यावेळी मी त्यांना त्याकरीता श्री वाघमोडे यांनी तुम्हाला ५,००,०००/– लाख रू. दयावे लागतील असे सांगीतल्याचे सांगीतले. परंतु सदर रक्कम जास्त होत असल्याने ती कमी करण्याची विनंती केली असता श्री सरोदे हे मला **"पन्नास कमी दया"** असे बोलले. त्यावर मी त्यांना साडेचार पण जास्त होतात असे बोलुन रक्कम अजुन कमी करण्याची विनंती केली असता त्यांनी **"चार करून घे"** असे सांगीतले. त्यावर मी त्यांना "तीन लाख पर्यंत साहेब" असे म्हणालो असता त्यास त्यांनी "ना" म्हणुन नकार दिला. तडजोडीअंती श्री सरोदे यांनी ४ लाख रूपये स्विकारण्याचे मान्य केले. श्री सरोदे यांनी सदरची रक्कम बाहेर भेटुन देण्यास सांगितले. त्यानंतर मी व पंच श्री सानप परत पोलीस वाहनाजवळ आलो. त्यानंतर आम्ही कार्यालयात परत आलो. त्यावेळी पो.नि. थोरात यांनी माझी व सिनिअर पी.आय. श्री. सरोदे यांचे संभाषणाची ट्रान्सस्क्रीप्ट बनवुन सदर पडताळणीवेळी लोकसेवक श्री. सरोदे यांनी माझ्याकडे रू. ४,००,०००/– लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाल्याचे सांगुन सविस्तर पंचनामा केला. त्यानुसार सापळापुर्व व सापळा कारवाई करण्यात येणार असल्याचे मला पो.नि. थोरात साहेबांनी सांगितले.

दिनांक २५/०९/२०२५ रोजी मी पो.नि.थोरात यांच्या कक्षात त्यांच्या समक्ष हजर झालो तेव्हा तेथे पोनि श्री मेखले हे देखिल हजर होते. मी श्री थोरात व मेखले यांना सांगितले की दिनांक २४/०९/२०२५ रोजी सिनिअर श्री. सरोदे यांच्याशी माझे रात्री फोनवर बोलणे झाले असून त्यांनी मला दिनांक २६/०९/२०२५ रोजी लाचेच्या रक्कमेसह लंचकरीता बाहेर भेटण्यास साधारण १३.०० वा. पर्यंत बोलावले आहे. त्यावर पो.नि.थोरात यांनी मला दिनांक २६/०९/२०२५ रोजी सापळा कारवाई करण्यात येणार असल्याबाबत सांगून मला योग्य त्या सुचना दिल्या.

मी दिनांक २६/०९/२००२५ रोजी सकाळी साधारण १०.०० वा. लाप्रवि कार्यालयात पो.नि.थोरात यांच्या समक्ष हजर झालो. पो.नि.थोरात यांनी पोउपनि श्री वाघमोडे यांचेकरीता ३०,०००/– रू. व सिनीअर पी आय श्री सरोदे यांना देण्याकरीता ४,००,०००/– रक्कमेबाबत पंचासमक्ष विचारणा केली. त्यावेळी मी त्यांना माझेकडे सध्या इतकी रक्कम उपलब्ध नसल्याचे सांगुन, माझे बचतीमधुन श्री वाघमोडे यांना देण्याकरीता रु. ३०,०००/– (रु.५००/– दराच्या भारतीय चलनी ६० नोटा) व सिनिअर श्री. सरोदे यांना देण्याकरीता २,००,०००/– (रू. ५००/– दराच्या भारतीय चलनी ४०० नोटा) इतकी रक्कम पो.नि. थोरात यांचेकडे लाच रक्कम म्हणुन वापरण्यास दिली. पो.नि. थोरात यांनी त्यांच्या मोबाईलमध्ये लाच रक्कमेच्या भारतीय चलनाचे नोटाचे फोटो काढुन त्याची पी.डी.एफ. तयार केली. त्यानंतर वेळेअभावी पो.नि.मेखले, पो.नि.थोरात, मी, दोन शासकिय पंच व सापळा पथकातील अंमलदार असे सापळा कारवाईकरीता शासकिय वाहनाने लाप्रवि, वरळी येथून रवाना होवून दादर (पुर्व) येथील स्वामिनारायण मंदिर समोरील श्रीकृष्ण हॉटेलमध्ये पोहोचलो. तेथे मी माझे खाजगी वाहन बोलावुन घेतले. सदर ठिकाणी पो.नि.थोरात यांनी मला सापळा कारवाई संदर्भात मार्गदर्शन केले. सदर ठिकाणी लोकांची वर्दळ जास्त असल्याने पो.नि.मेखले यांच्या सुचनेप्रमाणे पो.नि.मेखले, पो.नि.थोरात, पो.अ. /मिंडे, व दोन शासकिय पंच असे आम्ही माझ्या खाजगी वाहनाने माटूंगा ५ गार्डन येथे रवाना झालो. तसेच पो. नि.मेखले यांनी उर्वरित सापळा पथकातील अंमलदार यांना स्वामिनारायण मंदिर दादर येथे पुढील आदेशापर्यंत थांबण्याच्या सुचना दिल्या. आम्ही माटूंगा ५ गार्डन येथे पोहचल्यावर पो.नि.मेखले यांच्या सुचनेवरून पो.नि.थोरात, माझे, व दोन्ही शासकिय पंचाचे वक्तव्य पो.शि/मिंडे यांच्या मदतीने शासकीय वाहनातच घेण्यात आले. त्यानंतर पो.नि.थोरात यांनी मला सिनियर श्री.सरोदे यांच्या मोबाईलवर ते कार्यालयात हजर आहे किंवा कसे हे माहित करण्याकरीता फोन करण्यास सांगितले त्याप्रमाणे मी सिनियर सरोदे यांच्या मोबाईलवर फोन केला व ते

Scanned with OKEN Scanner

कार्यालयात उपस्थित असल्याबाबत खात्री करून त्यांना भेटायला येवू का? अशी विचारणा केली तेव्हा त्यांनी मला दुपारनंतर त्यांचे कार्यालयात येण्यास सांगितले.

पो.नि.थोरात यांचे सुचनेवरून पोअं श्री गारळे यांनी शासकिय वाहन माटुंगा ५ गार्डन येथे आम्ही थांबलेल्या ठिकाणी आणले. त्यानंतर पो.नि.थोरात यांचे सुचनेवरून पोअं गारळे यांनी श्री वाघमोडे यांना देण्यात येणाऱ्या ३०,०००/- (अक्षरी तीस हजार रूपये फक्त) लाचेच्या रक्कमेला व सफेद रंगाच्या पाकिटाला तसेच सिनियर सरोदे यांना देण्यात येणाऱ्या २,००,०००/-(दोन लाख रूपये) लाचेच्या रक्कमेला व सफेद रंगाच्या पाकिटाला अॅन्थ्रासिन पावडर लावून सदरची दोन्ही पाकिटे निळया रंगाच्या कापडी पिशवीमध्ये ठेवून त्या निळया रंगाच्या पिशवीला अन्थ्रासिन पावडर लावून पोअ गारळे यांनी माझ्या खाजगी वाहनात आणून पुढच्या ड्राव्हरमध्ये ठेवली. त्यानंतर पो.नि.थोरात यांनी पो.अ/मिंडे यांच्या मदतीने डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करून मी घातलेल्या शर्टच्या आतील बनियनला लावला. मी व पंच ०१ शेखर राऊत माझे खाजगी चारचाकी वाहन इनोव्हा क्रीस्टा क्र. MH03DU6118 या वाहनाने वडाळा टीटी पोलिस ठाणेच्या दिशेने रवाना झालो. सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार अन्य वाहनाने माझ्या मागोमाग वडाळा टीटी पोलीस ठाणेच्या दिशेने आले व पोलीस स्टेशनच्या थोडया अंतरावर थांबुन राहिले. मी व पंच ०१ शेखर राऊत वडाळा टीटी पोलीस ठाणे सिनियर श्री.सरोदे यांच्या कॅबीनमध्ये गेलो परंतु, सिनियर श्री. सरोदे यांनी आत अन्य लोक असल्याने मला हाताने इशारा करून बाहेर थांबण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी व पंच कॅबिनच्या बाहेर थांबलो. थोडयावेळाने आतील अन्य लोक बाहेर आल्यावर मी श्री सरोदे यांचे केबीनमध्ये गेलो. त्यावेळी पंच ०१ शेखर राऊत यांचेबाबत संशय येवु नये म्हणुन मी त्यांना हातानी इशारा करून कॅबिनच्या बाहेर थांबण्यास सांगीतले. मी श्री सरोदे यांचेसोबत माझ्या कामासंदर्भात चर्चा करत असतांना श्री सरोदे यांनी बेल वाजवुन श्री वाघमोडे यांना कॅबीनमध्ये बोलाविले. त्यानंतर आम्हा तिघांमध्ये माझे कामाबाबत चर्चा झाली. थोडया वेळाने श्री वाघमोडे बाहेर निघुन गेल्यावर श्री. सरोदे यांना मी बोललो काय करू साहेब त्यांच त्यांच्याकडे देवु आणी तुमचं तुमच्याकडे कि सर्व तुमच्याकडे देवु त्यावर ते म्हणाले" **काय आणलं काय?**" तेव्हा मी त्यांना बोललो " त्याला तीस हजार आहेत आणि तुम्हाला दोन आणलं दोन एक दोन दिवसांत आणून देतोय, आता मागे पुढे हं काय करू, गाडीत घेवून यू" त्यावर श्री सरोदे मला म्हणाले " **जा लवकर घेवून ये**" त्यावर मी त्यांना " बरं ठीकेयं, त्यांच्याकडं कोणाकडं देवून टाकू काय, त्याचं त्याच्या हातात देतो ना" त्यावर ते मला म्हणाले " दे ना मगं" म्हणुन मी श्री सरोदे यांना " मी गाडीत आणतो जावून हा " असे बोललो असता ते मला म्हणाले "**हा घेवुन ये**" असे म्हणालो व गाडीत ठेवलेली लाचेची रक्कम आणण्यासाठी पंच श्री शेखर यांचेसोबत माझे वाहनाजवळ गेलो. वाहनातुन लाच रक्कम असलेली निळी पिशवी घेवुन परत येत असतांना माझी पॅसेजमध्ये श्री वाघमोडे यांचेसोबत भेट झाली त्यावेळी मी त्यांना म्हणालो " तुमचं पाकीट आणलं घेवून टाका साहेबांना बोललो मी " असे बोलुन श्री वाघमोडे यांना निळया पिशवीमधुन ३०,०००/- रू. लाच रक्कम ठेवलेले पांढरे पाकिट काढुन दिले. ते त्यांनी स्विकारले व दुसऱ्या माळयावर निघुन गेले. त्यावेळी पंच श्री शेखर माझेपासुन थोडया अंतरावर उभे होते. त्यानंतर मी सिनीअर श्री सरोदे यांचे कॅबीनमध्ये गेलो. तेव्हा श्री सरोदे हे आपल्या खुर्चीमध्ये बसले होते. मी त्यांच्या समोर जावुन लाच रक्कम रू. २,००,०००/- असलेली निळया रंगाच्या पिशवी समोर धरली. तेव्हा श्री सरोदे यांनी उजव्या हाताने स्विकारून उजव्या बाजुला ठेवले. त्यानंतर मी उठुन बाहेर आलो व सापळा पथकाला माझे हाताने थम दाखवुन लाच स्विकृतीचा पुर्वनियोजीत इशारा केला.

सदरचा इशारा होताच सापळा पथकाने पचांसह तेथे प्रवेश करून पीएसआय वाघमोडे व सिनियर श्री. सरोदे यांना लाचेच्या रकमेसह ताब्यात घेतले. त्यानंतर सापळा पथकातील अधिकाऱ्यांनी सापळयाची तेथील कारवाई पुर्ण केल्यानंतर लोकसेवक पीएसआय वाघमोडे व सिनियर श्री. सरोदे यांचेसह आम्ही सर्व एसीबी कार्यालय, वरळी, मुंबई येथे आलो.

Scanned with OKEN Scanner

लोकसेवक श्री राहूल रमेश वाघमोडे, पोलीस उप निरीक्षक व श्री.चंद्रकांत सुधाकर सरोदे, वरिष्ठ पोलीस निरिक्षक यांनी त्यांच्या पदाचा दुरूपयोग करून, स्वत:च्या आर्थिक फायदयाकरीता माझेकडुन लाचेची मागणी करून लाच स्विकारल्याने माझी त्यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझा वरील जबाब माझे सांगणे प्रमाणे मराठीत टंकलिखीत करून मला हिंदीतुन समजावुन सांगीतला असुन तो माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष,

(नितीन थोरात)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

MVenkell
27/9/25

Scanned with OKEN Scanner

तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ..........

Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचा तपशील ( आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा ) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ..........

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ..........

Unnatural / Accidental Death Case No., if any.

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा ) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील नमुद तक्रारदार यांच्यावर कुडाळ दि. दि. पोलीस ठाणे येथे दाखल गुन्ह्यात त्यांच्या मुलीस आरोपी न करण्यासाठी व गुन्ह्यात मदत करण्यासाठी आलोसे क्र. 2 यांनी स्वतः साठी 50,000/- रु. ची मागणी करून तक्रारदार यांचे विरोधक यांचे विरुद्ध कारवाई करण्यासाठी आलोसे क्र. 01 यांचे करीता 5,00,000/- रु ची मागणी केली. आलोसे क्र. 2 यांनी दि. 10/04/25 रोजी स्वतः साठी 20,000/- तर उर्वरीत 30,000/- रु दि 26/04/25 रोजी पंचासमक्ष स्विकारले तर आलोसे क्र. 01 यांनी तक्रारदार यांना मागणी केलेल्या 5,00,000/- रु मध्ये तडजोडी अंती 4,00,000/- रु स्विकारण्यास संमती देवुन दि 26/04/25 रोजी त्यापैकी पहिला हप्ता 2,00,000/- स्वतः स्विकारले त्यावेळी दोन्ही आरोपींना पंचासमक्ष रंगेहाथ पकडुन सदरचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

13. केलेली कार्यवाही –1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : श्री नितीन थोरात, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

..........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन .......... जिल्हा .......... राज्य ..........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O) .............. Rank .............. No. ............ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ..........

(3) Transferred to P. S. ..........
District .......... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.
(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant/Informant

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name श्री नितीन थोरात
पदनाम Rank पोलीस निरीक्षक
तपासिक अ. चा कोड क्र.
Posting लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
Code No. of I. O. ..........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ..........
1. Date and time of submitted to the Court.

| प्रत Copy to | 2 फिर्यादी, 2. Complainant, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 3. Supdt. of Police (Computer), | 4. तपासिक अंमलदार, 4. Inv. Officer, | 5. स्थळ प्रत. 5. Office Copy. |
|---|---|---|---|---|

Attachment to item 7 of First Information Report

Scanned with OKEN Scanner